आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
२१ सप्टेंबर २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- वस्तू आणि सेवा कराच्या नवीन दरांची उद्यापासून अंमलबजावणी

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संध्याकाळी ५ वाजता राष्ट्राला संबोधित करणार

- सायबर सुरक्षेबरोबरच अमली पदार्थ संदर्भातल्या गुन्ह्यांप्रकरणी राज्य शासनाचं ‘झिरो टॉलरन्स धोरण’ असल्याचं मुख्यमंत्र्यांचं प्रतिपादन

आणि

- शारदीय नवरात्रौत्सवानिमित्त राज्यात जय्यत तयारी

**<><><><>**

जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर रचनेत सुधारणा करण्याचा केंद्रसरकारचा निर्णय उद्यापासून लागू होणार आहे. त्यामुळे अनेक क्षेत्रातल्या उत्पादनांच्या किमतीवर तसंच ग्राहकांवर याचा सकारात्मक परिणाम होणार आहे. जीएसटी पुनर्रचनेचा ऑटोमोबाईल क्षेत्रावर होणारा परिणाम जाणून घेऊ या

***.... होल्ड- व्हॉईस कास्ट- भक्ती- -***

*(नवरात्र किंवा विजयादशमीनिमित्त नवीन वाहन खरेदी करु इच्छिणाऱ्यांना जीएसटी कररचनेतल्या बदलाचा फायदा होणार आहे. नव्या कररचनेनुसार ऑटोमोबाईल क्षेत्रातले जीएसटी दर कमी करण्यात आले आहेत. दुचाकी आणि लहान कारवरील जीएसटी २८ टक्क्यावरून १८ टक्के करण्यात आला आहे. मोठ्या कारवर ४० टक्के जीएसटी आकारला जाईल मात्र या वाहनावरचा उपकर रद्द करण्यात आला आहे. परवडेल अशा दरात ही वाहनं उपलब्ध होतील. अनेक ऑटोमोबाईल कंपन्यांनी नव्या जीएसटी दररचनेनुसार वाहनांचे नवे दर जाहीर केले आहेत. मारुती सुझुकी या कंपनीने आपल्याकडील विविध कारच्या नव्या किमती जाहीर केल्या असून सणासाठी नव्या ऑफरही दिल्या आहेत. एकूणच या निर्णयामुळे ग्राहक आणि व्यावसायिक दोन्ही बाजूने उत्साहाचे वातावरण आहे.*

*किमती कमी झाल्यामुळे नवी वाहनं बाजारात येतील आणि ऑटोमोबाईल क्षेत्राला चालना मिळेल. याचा थेट फायदा तरुण, व्यावसायिक आणि कनिष्ठ मध्यमवर्गीयांना होणार आहे.)*

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संध्याकाळी ५ वाजता राष्ट्राला संबोधित करणार आहेत. आकाशवाणी आणि दूरदर्शनवरुन त्यांच्या भाषणाचं थेट प्रसारण होईल.

आकाशवाणी मुंबईवरून संध्याकाळी ५ वाजता प्रसारीत होणारं बातमीपत्र आज ४ वाजून ५६ मिनिटांनी प्रसारीत होईल.

**<><><><>**

कायदा आणि सुव्यवस्थेच्या प्रभावी अंमलबजावणीनं देश महासत्तेकडे वाटचाल करू शकतो. त्यामुळे राज्यात पोलीस व्यवस्थेच्या सुधारणांवर भर देण्यात आला असून सायबर सुरक्षेबरोबरच अमली पदार्थ संदर्भातल्या गुन्ह्यांप्रकरणी राज्य शासनानं ‘झिरो टॉलरन्स धोरण’ अवलंबलं असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. भाजप युवा मोर्चाच्या 'नमो युवा रन फॉर नशा मुक्त भारत' कार्यक्रमाचा प्रारंभ मुख्यमंत्र्यांनी आज मुंबईत केला, त्यावेळी ते बोलत होते. ‘नशामुक्त भारत, नशामुक्त महाराष्ट्र आणि नशामुक्त मुंबई’ या संकल्पनेवर आधारित या नमो रन मॅरेथा ॅनमुळे आपली तरुणाई देशभक्तीला प्राधान्य देईल तसंच देशाला सर्वोच्च स्थानी नेण्याच्या आणि देशाला आत्मनिर्भर करण्याच्या ध्यासानं प्रेरित होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.

कार्यक्रमाला पालक मंत्री मंगलप्रभात लोढा, ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ, मिलिंद सोमण आदी मान्यवर उपस्थित होते. सेवा पर्वाचा भाग म्हणून परभणी इथंही नमो युवा रन मॅरेथॉन झाली. त्यात सुमारे सहाशे मुलं-मुली सहभागी झाली होती, तसंच मॅरेथॉन नंतर रक्तदान शिबिराचं आयोजन करण्यात आलं होतं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्तानं सुरु करण्यात आलेल्या ‘सेवा पर्व’ अंतर्गत ‘नमो युवा रन’ हा उपक्रम देशभरात विविध ठिकाणी राबवला जात आहे.

नवी दिल्ली मध्ये केंद्रीय जलशक्ती राज्यमंत्री राजभूषण चौधरी आणि भाजप खासदार मनोज तिवारी यांनी आज नवी दिल्ली इथं ‘नमो युवा रन’ कार्यक्रमाला हिरवा झेंडा दाखवला.

**<><><><>**

सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरून चालताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकार देशाच्या सर्वसमावेशक प्रगतीसाठी प्रयत्नशील आहे. केंद्र सरकारनं देशात यूपीआय क्रांती घडवून आणल्यामुळे डिजिटल व्यवहारात वाढ झाली आहे. यामुळे डिजिटल पेमेंट करणं सोपं आणि सुरक्षित झालं आहे. याविषयी अधिक माहिती जाणून घेऊया…

- - **व्हीसी -- -**

*(केंद्र सरकारनं गेल्या दशकभरात तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अनेक बदल घडवून आणले. यूनिफाईट पेमेंट सिस्टम म्हणजेच यूपीआय हा या बदलातला महत्त्वपूर्ण भाग आहे. २०१६ ला देशात यूपीआय सुविधा सुरू झाली. विविध बँक खाती एकाच ॲप्लिकेशनमधे एकत्रित आल्यामुळे पेमेंट करणं सुलभ झालं. यूपीआयमुळे झालेल्या फायद्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आपल्या स्वातंत्र्यदिनाच्या भाषणात म्हणाले….*

- ***- होल्ड बाईट मोदी - -***

*गेल्या नऊ वर्षांत यूपीआयचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला आहे. ऑगस्ट २०२५ मधे यूपीआयद्वारे २० अब्ज रुपयांपेक्षा जास्त पैशांचा व्यवहार झाल्याची नोंद आहे. यूपीआयमुळे मोठ्या व्यापाऱ्यांपासून छोट्या विक्रेत्यांपर्यंत सगळ्यांनाच फायदा झाला आहे.*

*यूपीआयचा विस्तार आता देशासह आंतरराष्ट्रीय पातळीवरही झाला आहे. संयुक्त अरब अमिराती, भूतान, बांगलादेश, श्रीलंका, मॉरिशस, फ्रान्स यांसारख्या देशातही आता यूपीआयचा वापर होत आहे. कॅशलेस अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करण्यात आणि आर्थिक समावेशनाला चालना देण्यात यूपीआयनं महत्त्वाची भूमिका बजावली आहे.)*

**<><><><>**

शारदीय नवरात्रौत्सवाला उद्यापासून प्रारंभ होत असून राज्यातल्या देवीच्या साडेतीन शक्तीपीठांसह सर्वच देवी मंदिरांमधे उत्सवाची तयारी उत्साहाने होत आहे. अनेक ठिकाणी सार्वजनिक नवरात्रौत्सवाचं आयोजन करण्यात आलं असून मंडपांमधे माता महिषासुरमर्दिनीच्या मूर्ती विराजमान होत आहेत. तुळजापूरचं तुळजाभवानी मंदिर

कोल्हापूरचं महालक्ष्मी मंदिर, नांदेड जिल्हातल्या माहुरचं रेणुका माता मंदिर तसंच वणीच्या सप्तश्रृंगी देवी मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त जय्यत तयारी करण्यात आली आहे.

धाराशिव जिल्ह्यातल्या तुळजापूरच्या एसटी आगारात भाविकांच्या सोयीसाठी पन्नास  नव्या बस दाखल होणार आहेत. घटस्थापनेपासून कोजागिरी पौर्णिमेपर्यंत तुळजापूर-सोलापूर, तुळजापूर-धाराशिव, तुळजापूर-लातूर, तुळजापूर-कोल्हापूर आदी मार्गांवर बसच्या दररोज सुमारे दोनशे फेऱ्या होणार आहेत.

<><><>

जगभरात आज ‘अल्झायमर्स दिना’ निमित्त विविध कार्यक्रम होत आहेत. अल्झायमर्सचं लौकर निदान, तसंच योग्य उपचारांच्या दृष्टीनं  या विषयी जनजागृती महत्त्वाची असल्याचं केंद्रीय आरोग्य आणि कुटूंब कल्याण मंत्री जगत प्रकाश नड्डा यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

<><><>

गडचिरोली जिल्ह्यात हालूर गावातल्या महिलांच्या पुढाकाराने सर्व  ग्रामस्थांनी मिळून गावात दारुबंदीचा ठराव मंजूर केला. व्यसनमुक्ती क्षेत्रात काम करणाऱ्या लॉईड्स इन्फिनिट फाउंडेशनच्या पाठिंब्यानं गावाच्या समग्र विकासासाठी गावातल्या महिलांनी हे ऐतिहासिक पाऊल उचललं.

<><><>

H 1B व्हिसासाठीची शुल्कवाढ ही फक्त नव्या अर्जदारांसाठी असून ही रक्कम फक्त एकदाच भरायची आहे, असं अमेरिकेतल्या व्हाईट हाऊसच्या माध्यम प्रवक्ता केरोलीन लीविट यांनी काल प्रसिद्ध केलेल्या निवेदनात स्पष्ट  केलं. H 1B व्हिसाचं शुल्क दोन ते पाच हजार अमेरिकन डॉलरवरून वाढवून ते १ लाख डॉलर करण्याचा निर्णय अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी घेतला आहे.  त्यामुळे अनेक कुटुंबांना फटका बसणार असून अमेरिकन प्रशासनानं याचा विचार करावा अशी प्रतिक्रिया भारतानं दिली होती.  त्यानंतर अमेरिकेचं हे स्पष्टीकरण आलं आहे.  जे H 1B व्हिसाधारक सध्या अमेरिकेबाहेर आहेत त्यांना एक लाख डॉलर भरण्याची आवश्यकता नाही,   तसंच व्हिसाचं नूतनीकरण करण्यातही या निर्णयामुळे अडचण येणार नाही, असं लीविट यांनी समाजमाध्यमावरल्या पोस्टद्वारे सांगितलं.

<><><><>

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज सुपर फोर मध्ये भारत विरुद्ध पाकिस्तान सामना होणार आहे. दुबईत भारतीय वेळेनुसार रात्री आठ वाजता या सामन्याला सुरुवात होईल. भारतीय संघानं या स्पर्धेत पाकिस्तानविरुद्धच्या या आधीच्या सामन्यात सहज विजय नोंदवला आहे. हा सामना जिंकल्यास भारताला थेट अंतिम सामन्यात प्रवेश मिळेल. अंतिम सामना येत्या २८ डिसेंबरला होणार आहे. सुपर फोर गटामध्ये काल झालेल्या पहिल्या सामन्यात बांगलादेशच्या संघानं श्रीलंकेवर विजय मिळवला.

<><><><>

पुढच्या पाच दिवसात रायगड, रत्नागिरी, नाशिक, पुणे, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, बीड, हिंगोली, परभणी, लातूर, नांदेड, धाराशिव येथे मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे, तर मुंबई, ठाणे, पालघर, सिंधुदुर्ग, धुळे, नंदुरबार, जळगाव, कोल्हापूर, सातारा, सांगली येथे हलका ते मध्यम पाऊस पडेल अशी शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

//<><><><>//